# एम.ए., एम.कॉम.,एल.एल.एम. ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभागातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० नियमित अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी शनिवार (दि.२५) पासून ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. एम.ए. प्रथम वर्ष (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशायस्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र), एम.कॉम. प्रथम वर्ष, एल.एल.एम. प्रथम वर्ष या तीन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून अंतिम मुदत २० जून आहे. दि. ३१ जून रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येईल. प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीअंतर्गत दि. ३ जुलै रोजी उपलब्ध जागांची माहिती जाहीर करण्यात येईल. त्यानंतर दि. ४ रोजी प्रत्यक्षात प्रवेश घेता येणार आहेत. दुसऱ्या फेरीच्या जागांची माहिती दि. ६ जुलै रोजी जाहीर होऊन दि. ८ जुलै रोजी प्रत्यक्षात प्रवेश घेता येणार आहे. तिसरी प्रवेश फेरी दि. १० जुलै रोजी सुरू होईल. प्रवेश प्रक्रियेची माहिती व ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAY 2019

तरुण भारत

# पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर (एम. ए., एम. कॉम., एल. एल. एम)ची प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून सुरू झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० नियमित अभ्यासक्रमाचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरून त्याची प्रिंट विद्यापीठाकडे जमा करावयाची आहे. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात विद्यापिठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.

**एम. ए., एम. कॉम., एल. एल. एम.चा समावेश**

एम. ए. प्रथम वर्ष (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र) एम. कॉम. प्रथम वर्ष, एल.एल.एम. प्रथम वर्ष या तीन अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या असून २० जून अंतिम मुदत आहे. प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी ३ जुलै रोजी जाहीर होणार आहे. ४ जुलै रोजी प्रत्यक्षात प्रवेश घ्यावयाचे आहेत. ६ जुलै रोजी दुसऱ्या फेरीच्या जागांची माहिती जाहीर होईल, ८ जुलै रोजी प्रत्यक्ष प्रवेश घ्यावयाचे आहेत. तर उर्वरीत जागांसाठी तिसरी फेरी १० जुलै रोजी जाहीर होईल.